# शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर

राष्टीय महामार्ग क्र.०६, मुर्तिजापुर -अमरावती रोड, हेंडज,मुर्तिजापुर

ता.मुर्तिजापुर,जि.अकोला-४४४१०७

Email : office.gpmurtijapur@dtemaharashtra.gov.in and Web - www.gpmzr.ac.in

principalgpmzr@gmail.com ☎ (०७२५६-२९९३९१,९४२३६८९३९१


---

## निविदा

शासकीय तंत्रनिकेतन ,, मुर्तिजापूर या संस्थेतील साफसफाई कामाकरिता इच्छुक पंजीकृत व अनुभवी संस्थेकडून निविदा मागविण्यात येत आहे. निविदा अर्ज शुल्क **रुपये ५००/-** असुन कोऱ्या निविदा प्रपत्र दि.**१८/०९/२०२५ ते २९/०९/२०२५** या कालावधीत कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी (रविवार व इतर शासकीय सुटीचे दिवस वगळून ) वेळ सकाळी **११ ते ५** वाजेपर्यंत शासकीय तंत्रनिकेतन ,मुर्तिजापूर येथे मिळतील तसेच निविदा स्विकृत्ती दि.**२९/०९/२०२५**रोजी **सायं .५** वाजेपर्यंत राहील

नियम व अटी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या कार्यालयात / सुचना फलकावर व संस्थेच्या संकेतस्थळावर पाहावयास मिळतील

**निविदा ३०/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थीतांच्या समक्ष संस्थेतील जीमखाना सभागृहात उघण्यात येत्रील**

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन,मुर्तिजापुर.

# शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर

## साफसफाई निविदा प्रक्रिया २०२५

### नियम व अटी

१. करारात ठरेल त्याप्रमाणे शा.तं.नि.मुर्तीजापुर येथील १६६४० चौ.मीटर (प्रशासकीय इमारत, कर्मशाळा, मुलांचे आणि मुलींचे वसतीगृह,मुलांचे आणि मुलींचे प्रसाधनगृह, पंप हाऊस, सुरक्षा रक्षकांची चौकी, सर्व रस्ते , सांडपाण्याच्या सर्व नाल्या, पार्कींग ॲन्ड जरनेटर रुम, LT & HT रुम ) एवढया जागेकरीता व रस्त्यांकरीता सफाईसाठी मोंबदला देय राहील. (सदर जागा व रस्ते संस्थेत निविदा सादर करण्यापुर्वी पाहुन व समजुन घ्यावेत).

२. सफाई कामगाराच्या अनुपस्थितीच्या बाबतीत मोबदला यथाप्रमाणे कमी करण्यात येईल.

३. आपल्या सफाईगाराची सेवा हि ठेकेदारी पदधतीची सेवा आहे ज्यामुळे शासकीय सेवाद्वारे आपल्या आस्थापनेवरील कर्मचारी असल्यामुळे त्यांच्या सेवा शर्ती , सुटटया व इतर बाबींशी या कार्यालयाचा काहीही संबंध राहणार नाही.

४. जे सफाईगार /कर्मचारी या संस्थेत नेमल्या जातील त्यांच्या बाबतची माहिती उदा.नाव, पत्ता, शैक्षणीक अहर्ता, आधारकार्ड,अलीकडचा काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो वगैरे आणि चारित्र्याबाबतचा आपला अभिप्राय इत्यादी माहिती संस्था प्रमुखास पुराव्यासहित देणे आवश्यक आहे.

५. एखादया सफाईगार / कर्मचा-याची सेवा आक्षेपार्ह वाटत असल्यास संस्थेच्या प्राचार्याची शिफारस असल्यास संबंधीत सफाईगार / कर्मचारी बदलुन दयावा लागेल.

६. सफाईगार/कर्मचारी कामावर रुजु होतांना किंवा कामावरुन मुक्त होतांना कोणत्याही प्रकारचा भत्ता देय राहणार नाही.

७. आपल्या एजन्सीचे काम समाधानकारक नसल्यास आपला करार त्वरीत रदद करण्यात येईल , याची सर्वस्वी जबाबदारी एजंसीवर राहील.

८. सफाईगार/कर्मचारी कामावर कार्यरत असताना/येतांना/जातांना काही अपघात झाल्यास शा.तं.नि.मुर्तीजापुर हि संस्था नुकसान भरपाईस जबाबदार राहणार नाही. ती सर्वस्वी जबाबदारी एजन्सीवर राहील.

९. आपण प्रत्येक महिन्याच्या ०७ तारखेपर्यंत आपल्या सफाई कामगारांना पगार करावा व या बाबतीत सफाई कामगारांनी संस्थेकडे तक्रार करता कामा नये. त्याकरीता शासकीय तंत्रनिकेतन , मुर्तीजापुर हि संस्था जबाबदार राहणार नाही.

Govt. Polytechnic Murtizapur, Dist. Akola सत्यमेव

१०. साफसफाई करीता लागणारे साहित्य कंत्राटदाराला स्वत: पुरवावे लागेल (उदा. फिनाईल,सिंधी झाडु , खराटे, डांबर गोळया, ॲसिड, बादली,मग,मुलायम झाडु, ओडोनील , हार्पिक, इत्यादी साहित्य दररोज साफसफाई करतांना वापरावे लागेल. ) साफसफाईचे साहित्य दर महिन्याच्या सुरवातीस संस्थेत आणावे लागेल आणि सदर साहित्य प्रभारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दयावे लागेल.

११. कोणतेही कारण न दाखवता करार रदद करण्याचे अधिकार शासकीय तंत्रनिकेतन,मुर्तीजापुर या संस्थेच्या प्राचार्यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१२. सफाई कामगार आजारी / सुटीवर असल्यास त्वरीत एजेंसीला पर्यायी व्यवस्था करावी लागेल.

१३. आपली एजन्सी हि लेबर कायदा (Labour Act ) आणि कारखाना कायदा (Factory Act) अंतर्गत असलेल्या नियमांचे पालन करण्यास बंधनकारक राहील व हि सर्वस्वी आपली जबाबदारी राहील.

१४. आपली एजन्सी शासकीय नियमानुसार पंजीकृत असावी व त्याचे नुतनीकरण वेळोवेळी नियमानुसार करावे. फॉर्मसोबत एजन्सी पंजीकृत असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे.

१५. आपण नेमलेल्या सफाई कामगारांचा मोबदला हा न्युनतम मोबदला कायदा (Minimum Wages Act) व Worksmen Compansation Act नुसार पंजीकृत रक्कम अदा करणे ती सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

१६. वरिष्ठ कार्यालयाकडून कंत्राट दिल्याची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुरुवातीला ०२ महिने प्रायोगिक तत्वावर काम करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येतील व काम समाधानकारक आढळल्यास उर्वरीत ०९महिन्याच्या कालावधी करीता आदेश देण्यात येतील. तदनंतर करार कालावधीतील सेवा समाधानकारक असल्यास सदर करारास प्रत्येकी ०६ महिने कालावधीच्या जास्तीत जास्त दोन मुदतवाढी देण्याचे अधिकार मा.प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,मुर्तीजापुर यांनी राखुन ठेवण्यात आले आहेत. परंतु सेवा समाधान कारक नसल्यास केव्हाही करार संपुष्टात आणण्याचे अधिकार मा.प्राचार्यांनी राखुन ठेवले आहेत.

१७. सफाई कामगाराच्या कामातील त्रुटी निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यावर आपणास तात्काळ कार्यवाही करावी लागेल.

१८. सफाई कामगार गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसावा , बालकामगार /बालमजूर नसावा तसेच तो तत्पर व आज्ञाधारक असावा याची खात्री एजन्सी करुन घेण्यात यावी.सफाई कामगारांना ओळखपत्र आणि गणवेश एजन्सी मार्फत पुरविणे बंधनकारक राहील.

१९. सफाई कामगारास अतिरिक्त डयुटी देण्यात येउ नये. त्याकरीता अधिकचे सफाई कमगार (जादा) एजन्सीकडे असावेत.

२०. सफाई एजन्सी, संस्थेच्या प्राचार्यासोबत महिन्यातुन तिस-या शनिवारी एकदा सफाई यंत्रणेबाबत चर्चा करतील.

२१. प्रात्यक्षीक अनुभवानंतर प्राचार्य,शा.तं.नि.मुर्तीजापुर यांना येणारी अडचण लक्षात घेवून आपणांस कळविल्यास ती बाब अट समजण्यात येईल.

२२. सफाई कामगारांची वागणुक संस्थेतील अधिकारी /कर्मचारी आणि विदयार्थ्यांशी सौहार्दपुर्ण असावी.

Govt. Polytechnic, Murtizapur, Dist. Akola
सत्यमेव

२३. संस्थेतील संबंधीत जागेतील स्वच्छता दररोज **सकाळी १०:०० पुर्वी** व्हावी. विशेषतः वर्गखोल्या, कार्यालय आणि प्रयोगशाळांची स्वच्छता **सकाळी १०.३० पुर्वी** करणे बंधनकारक आहे.

**२४. शासनाने वेळोवेळी नियमानुसार लागू केलेले कर जसे सेवाकर, आयकर, व्यवसाय कर इत्यादी संबंधित सेवापुरवठादारास भरणे बंधनकारक राहील व तो कर भरल्याचा पुरावा या कार्यालयास सादर करावा लागेल. दर महिन्याचे देयक सादर करताना त्यापुर्वीच्या सेवाकर अदा केल्याबाबतची पावती या कार्यालयात सादर करावी लागेल.**

२५. सफाई कामगाराचा सहभागी भविष्य निर्वाह निधी EPF असल्यास संबंधित एजन्सीला भरणे बंधनकारक राहील त्याचा शासकीय तंत्रनिकेतन,मुर्तीजापुर या संस्थेशी काही संबंध राहणार नाही.

२६. सफाई कामगाराच्या सेवा विषयक बाबी आपले सेवापुरवठादारास बंधनकारक राहील.

२७. सफाई कामगारांची या संस्थेच्या परिसरात राहण्याची व्यवस्था संस्थेतर्फे केली जाणार नाही.

२८. सफाई कामगाराच्या कर्तव्यावर संस्थेचे नियंत्रण राहील त्याच बरोबर आपणही एक सुपरवायजर नेमून स्वच्छतेबाबत नियंत्रण करणे आवश्यक राहील. कर्तव्य कालावधी मध्ये कोणतेही गैरकृत्य अथवा कामचुकार क़ेल्यास त्याची जबाबदारी सेवापुरवठादारावर राहील.

२९. सफाई कामगाराला कर्तव्य वेळेत धुम्रपान किंवा मादक पदार्थांचे सेवन करता येणार नाही.तसेच संस्थेच्या आवारात कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

Govt. Polytechnic Murtizapur, Dist. Akola सत्यमेव

३०.सफाई कामगारांनी ठरवुन दिलेल्या परीसरात एकाच ठिकाणी राहणे,बसणे, मदयपान किंवा नशायुक्त पदार्थांचे सेवन करणे,गैरवर्तन करणे इ.बाबी आढळल्यास तसे आपल्या कार्यालयास कळविण्यात येईल व आपणातर्फे कारवाई होणे बंधनकारक राहील.

३१. सफाई कामगार यांनी त्यांना शासकीय सेवेत सामावुन घेणेबाबत कामगार न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण इ. यांचेकडे धाव घेतल्यास संस्था प्रमुख शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तीजापुर / वरिष्ठ कार्यालय जवाबदार राहणार नाही तसेच त्यांचा दावा ग्राहय धरण्यात येणार नाही.

३२. कंत्राटदाराकडुन प्राप्त झालेले सफाई कामगाराचे देयक हे कोषागार कार्यालयाकडून पारीत झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल तसेच काही तांत्रिक अडचण उदभवल्यास देयकास विलंब होऊ शकतो.

३३. एजन्सीला सफाई कामगारांची सेवा बंद करावयाची असल्यास एक महिन्याची पुर्व सुचना देणे आवश्यक राहील.

३४. निविदा पाकिटावर **करार पदधतीने सफाई कामगार पुरविणे बाबत निविदा** असा स्पष्ट उल्लेख असावा.

३५. कराराचे आदेश मिळाल्यानंतर आपली निविदा स्विकारण्यात आल्यास निविदा करार रक्कमेच्या दुप्पट परंतु हजार च्या पटीत रोख सुरक्षा ठेव कार्यालयास जमा करावे लागेल, हि सुरक्षा ठेव करार रदद झाल्यानंतरच देय राहील.

३६. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त ) स्टँप पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

**३७. निविदा भरतेवेळी प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन , मुर्तीजापुर (Principal Government Polytechnic Murtizapur ) यांचे नावे धनाकर्ष / Demand Draft (D.D.) payable at Murtizapur रुपये २०,०००/- (रुपये वीस हजार फक्त ) निविदा सोबत लिफाफा क्र.०१ मध्ये दयावा लागेल, हि रक्कम ज्यांची निविदा स्विकारण्यात आली नसेल त्यांना निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत परत करण्यात येईल.**

३८. सफाई करीता कंत्राटी आदेश दिल्यानंतर एक आठवडयाच्या आत आदेश स्विकारणे व प्रत्यक्ष काम सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा निविदा भरतेवेळी जमा केलेली रक्कम शासन जमा करण्यात येईल व कोणत्याही परीस्थीतीत परत करण्यात येणार नाही..

३९. सफाई कामगारांनी कर्तव्यावर हजर होतांना तसेच संस्थेतून बाहेर जाताना सुरक्षा रक्षकांच्या चौकीवर नोंदणी करणे आवश्यक राहील.त्याकरीता त्यांना सेवा पुरवठादाराने गणवेश व ओळखपत्र पुरविणे आवश्यक राहील.

४०. मुलींच्या वसतिगृहात सफाई करण्याकरीता केवळ स्त्री सफाई कामगारच ठेवावी लागेल, पुरुष सफाई कामगाराला मुलींच्या वसतीगृहात प्रवेश राहणार नाही.

४१. निविदा सादर करतेवेळी निविदा फॉर्मचे अवलोकन करावे तसेच निविदा दोन लिफाफा पदधतीने सादर करावी.

४२. निविदा अर्जासोबत लिफाफा क्र.१ मध्ये पासपोर्ट आकाराचे दोन फोटो व निविदा अर्ज क्र.०१ वर नमुद सहपत्र सोबत जोडावेत.

४३. निविदा अर्जासोबत लिफाफा क्र.२ मध्ये , दर पुर्ण महिन्याकरीता ( साफ सफाई साहित्यासह ) प्रति माह प्रमाणे दिलेल्या रकान्यामध्ये भरावा.

४४. निविदाधारक यांच्याजवळ 1HP पाण्याची मोटरपंप व ३०० फुट पाईप (साईज ३/४ ") असणे आवश्यक आहे.

४५. स्वच्छता गृहात पाणी उपलब्ध आहे किंवा नाही याची शहानिशा करणे बाबतची जबाबदारी सफाई कामगाराची राहील आणि पाणी उपलब्ध नसल्यास संबंधीत अधिकारी यांना कळविणे व अपवादात्मक परिस्थितीत स्वच्छता गृहामध्ये पाण्याचा ड्रम भरणे ही जबाबदारी सफाई कामगाराची राहिल.

४६. निवेदेबाबत अंतिम निर्णय हा मा.प्राचार्य,शा.तं.नि.मुर्तीजापुर यांचा राहिल.

Govt. Polytechnic, Murtizapur, Dist. Akola

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मुर्तीजापुर

Principal
Government Polytechnic
Murtizapur

**दि.१६.०९.२०२५** रोजीच्या साफसफाई कंत्राट निविदा प्रक्रिया समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त अनु.०१ ते ४६ या नियम व अटी ठरविण्यात आलेल्या आहेत. सदरील नियम व अटिंना अंतिम मान्यतेकरीता मा.प्राचार्य यांना सविनय सादर.

| अ.क्र. | समिती सदस्य | समिती पदनाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | श्री.एम.डब्ल्यु ठाकरे,कर्मशाळा अधिक्षक | अध्यक्ष | |
| २ | श्री.एस.आर.पाचपोर,अधि.पदार्थ विज्ञान | सदस्य | |
| ३ | श्रीमती एम.आर.लोलुरे अधि.माहिती व तंत्र | सदस्य | |
| ४ | श्री.एन.व्हि.फांजे, अधि.विदयुत | सदस्य | |
| ५ | श्री.एम.एल.शुक्ला,अधि.विदयुत | सदस्य सचिव | |
| ६ | श्री.एस.जी.गजभिये,अधि.यंत्र | सदस्य | |
| ७ | श्री.जी.व्हि.डोंगरे,प्रबंधक | सदस्य | |

उपरोक्त अ.क. १ ते ४६ या नियम व अटिंना अंतिम मान्यता देण्यात येत आहे.

Govt. Polytechnic ★ Murtizapur, Dist. Akola

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन मुर्तीजापुर
**Principal**
**Government Polytechnic**
**Murtizapur**